सत्याची धार, अन्यायावर प्रहार

# प्रहार न्यूज

www.prahaar.in

सोमवार दि. 24/08/2026 संपादक : अनिल चौधरी पाने : 08

# १४ सायबर सुरक्षा सत्रांतून विद्यार्थ्यांमध्ये ऑनलाईन सुरक्षिततेची जागृती

## ५वी ते १२वी तसेच वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन



**पुणे :** डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर लक्षात घेता विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा आणि सुरक्षित ऑनलाईन बर्तनाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी क्यूईक हील फौंडेशन यांच्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत विविध शैक्षणिक संस्थांमध्ये सायबर जागृतीपर सत्रांचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत आतापर्यंत एकूण १४ सायबर सुरक्षा सादरीकरणे घेऊन २८०० हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत सायबर सुरक्षेचा संदेश पोहोचवण्यात आला. विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार सायबर सुरक्षेचे विषय सोप्या, समजण्यासारख्या आणि संवादात्मक पद्धतीने मांडण्यात आले.

या सत्रांमध्ये फिशिंग, बनावट लिंक, ओटीपी फसवणूक, मजबूत पासवर्ड, सोशल मीडिया सुरक्षितता, वैयक्तिक माहितीचे संरक्षण, ऑनलाईन अनोळखी, व्यक्तिंपासून सावधगिरी, डिजिटल फूटप्रिंट, एआय व दीपफेक, ऑनलाईन फसवणूक आणि सुरक्षित स्मार्टफोन वापर अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढवण्यासाठी Emoji Activity, प्रश्नमंजुषा, 'फाईन्ड दि मिस्टेक', रॅपिड फायर आणि परिस्थितीवर आधारित प्रश्न अशा विविध उपक्रमांचा वापर करण्यात आला. त्यामुळे विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन सायबर सुरक्षेबाबतच्या संकल्पना अधिक प्रभावीपणे समजून घेतल्या.

या उपक्रमामध्ये सायबर वॉरियर्स हर्षिता मुळजकर आणि सिद्धी सगरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सायबर सुरक्षेचे महत्त्व समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनीही विविध प्रश्न विचारत ऑनलाईन जगात सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक असलेल्या सवयी जाणून घेतल्या.

'सावध रहा, विचार करा आणि मगच क्लिक करा' हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. सुरक्षित डिजिटल सवयी आत्मसात करून विद्यार्थ्यांनी ऑनलाईन जगाचा जबाबदारीने वापर करावा, यासाठी या सत्रांद्वारे प्रयत्न करण्यात आले.

या उपक्रमासाठी के. बी. जोशी इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉमैशन टेक्नॉलॉजीच्या प्राचार्या डॉ. अनधा वैद्य, एचओ डी प्रा. रूपाली सराफ तसेच शिक्षक समन्वयक प्रा. मनाली सपकाळ यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.